| | | |
|---|---|---|
| | **पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण**<br>पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक - पिन 422003<br>दुरध्वनी नंबर 0253-2309700<br>E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |


**प्रेस नोट** दिनांक : २१/१२/२०२४

**नाशिक ग्रामीण पोलीस दलाची अवैध मद्यसाठा वाहतुक करणा-यांवर धडक कारवाई - वणी व चांदवड परिसरात १५ लाखांचा अवैध मद्यसाठा जप्त.**

---

दिनांक २०/१२/२०२४ रोजी पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक नाशिक ग्रामीण श्री. आदित्य मिरखेलकर, अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. अनिकेत भारती यांचे मार्गदर्शनाखाली नाशिक ग्रामीण जिल्हयात खालीलप्रमाणे अवैध मद्यसाठा वाहतुक करणा-यांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

दिनांक २०/१२/२०२४ रोजी वणी पोलीस ठाणे हद्दीत कसबे वणी गावातील के.आर.टी. कॉलेजचे समोर वणी ते सापुतारा जाणारे रोडवर अवैधरित्या मद्याची वाहतुक होत असल्याची गोपनीय बातमी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे यांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस पथकाने वणी ते सापुतारा जाणारे रोडवर सापळा रचुन एका हयुंडई कंपनीचे इवॉन कारवर छापा टाकुन **देशी मद्याचा १,६८,७००/- रू.** किंमतीचा अवैध मद्यसाठा व हयुंडई इवॉन कार वाहन असा **एकुण ३,१८,७००/- रू. किंमतीचा मुद्देमाल** जप्त केला आहे. सदर छापा कारवाईत इसम नामे साईनाथ भारत जाधव, वय- २५, रा. वागळुद, पो. लखमापुर, ता. दिंडोरी, जि.नाशिक हा विनापरवाना बेकायदेशीररित्या देशी व विदेशी मद्याची वाहतुक करतांना मिळुन आला आहे. सदरचा अवैध मद्यसाठा हा त्याचा साथीदार नामे किरण नागरे, रा. रामवाडी, नाशिक याचे दुकानातुन भरून आल्याचे उघडकीस आले असून सदर दोन्ही इसमांविरूध्द वणी पोलीस ठाणेस महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे चांदवड पोलीस ठाणे हद्दीत गणुररोड आशिष वाईन शॉप येथे अवैधरित्या मद्याची वाहतुक होत असल्याची गोपनीय बातमी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे यांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस पथकाने चांदवड ते देवळा जाणारे रोडवर सापळा रचुन एका मारुती इर्टीगा कारवर छापा टाकुन देशी मद्याचा २१,०००/- रू. किंमतीचा अवैध मद्यसाठा, तीन मोबाईल फोन व हयुंडई इवॉन कार वाहन असा **एकुण १०,३१,०००/- रू. किंमतीचा मुद्देमाल** जप्त केला आहे. सदर छापा कारवाईत इसम नामे १) सागर रमेश कोतवाल वय- ३०, २) प्रसाद किशोर सोनवणे, वय- २४, दोन्ही रा. चांदवड, ता. चांदवड, जि. नाशिक, हे विनापरवाना बेकायदेशीररित्या देशी मद्याची वाहतुक करतांना मिळुन आले आहे. सदर दोन्ही इसमांविरूध्द चांदवड पोलीस ठाणेस महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक, श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक, नाशिक श्री आदित्य मिरखेलकर, अपर पोलीस अधीक्षक, मालेगाव श्री. अनिकेत भारती, कळवण उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. किरणकुमार सुर्यवंशी, मनमाड उपविभागीय पोलीस अधिकारी, श्री बाजीराव महाजन यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे, सपोउनि, सुदाम मुंगसे, पोहवा. किशोर खराटे, सचिन देसले, प्रविण गांगुर्डे, पोना. नितीन डावखर, प्रदिप बहिरम, हेमंत गिलबीले, पोशि, सागर खाडे, प्रविण पवार, पुरूषोत्तम वाटाणे, सुनिल गांगोडे, किशोर बोडखे, ज्ञानेश्वर गांगुर्डे, तसेच चालक पोशि, हेमंत वाघ यांचे पथकाने वरील कामगिरी केली आहे.